# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २४/०३/२०१८

उपविभाग धानोरा अंतर्गत असलेल्या पोस्टे धानोरा हद्दीतील मौजा दराची ता. धानोरा जि. गडचिरोली येथे तलवारसिंग बाबुराव मडावी, वय-२५ वर्ष, रा. नाडेकल ता. कोरची जि. गडचिरोली याची माओवादयांनी डोक्यात गोळी घालून हत्या केली.

दिनांक २३/०३/२०१८ रोजी रात्री अंदाजे ०१.३० वाजेच्या सुमारास तलावरसिंग व त्यांची पत्नी चंदा मडावी हे आपले राहते घरी झोपेत असताना २० ते २५ बंदुकधारी माओवादी तलवारसिंग यास घरातून घेवून गेले. सकाळी तलवारसिंगचा शोध घेतला असता सिंदेसुर रोडवर तलवारसिंग मृत अवस्थेत आढळुन आला.

तलवारसिंग मडावी याने सन-२०१३ मध्ये पोलीसांसमोर आत्मसमर्पण केले यानंतर तो सन-२०१५ पर्यंत गडचिरोली येथे राहत होता. यानंतर त्यांनी मौजा दराची येथे कुटुंबासह आपली शेती सांभाळत सुखी व समाधानी जीवन उद्देशाने राहत होता परंतु माओवादयांना त्याचे समाधानी जीवन नको होते. आपले जीवन स्वत:च्या मर्जीने जगण्याचा हक्क त्याला असताना

माओवादयांनी त्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालत त्याची निर्घृण हत्या केली. यावरून माओवादयांना व्यक्तीस्वातंत्र्य नको असून बळजबरी◌ेने आपले विचार ते व्यक्तींवर लादत असल्याचे व आपल्या बंदुकीच्या जोरावर गरीब आदिवासींच्या जीवनाशी खेळत असल्याचे दिसून येते.